# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

इतिवृत्तांतः--

कार्यासन 30.

विषय-- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक 07 जून 2012 रोजी संपन्न झालेल्या 11 व्या बैठकीचे इतिवृत्तांत.

दिनांक 07 जून 2012 रोजी दुपारी 3.00 वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची 11 वी बैठक कामगार आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह येथे पार पडली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1 | श्री मधुकर गायकवाड | : मा.कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई तथा अध्यक्ष |
| 2 | श्री जी रामाराव | मा.कल्याण आयुक्त,नागपूर |
| 3 | श्री अे. जी. अस्वले | : उप सचिव (कामगार विभाग) मंत्रालय, मुंबई 400 032. |
| 4 | श्री प्रदिप डांगे | उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई |
| 5 | श्री शि. म. म्हात्रे | उप सचिव वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई |
| 6 | श्री राजेश फुले | : कामगार प्रतिनिधी |
| 7 | श्री दादाराव डोंगरे | : कामगार प्रतिनिधी |
| 8 | श्रीमती राधिका गायकवाड | : कामगार प्रतिनिधी |
| 9 | श्री वसंत गणपत सावंत | : कामगार प्रतिनिधी |
| 10 | श्री मुनदर शेख | : कामगार प्रतिनिधी |
| 11 | श्री प्रकाश देवताळे | : मालक प्रतिनिधी |
| 12 | श्री र. वि. कुलकर्णी | कामगार उप आयुक्त तथा सचिव |
| 13 | श्री सु.मा. कदम | सहायक कामगार आयुक्त, मुंबई |

सर्व प्रथम अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीस सुरुवात केली.

<u>**विषय कमांक 1**</u>– मागील दिनांक 18 मे 2012 रोजीचे बैठकीच्या इतिवृत्तांताचे वाचन करून इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

<u>**विषय कमांक 2**</u>– मंडळाच्या नोंदीत कामगारांना जनश्री विमा योजना लागू करणे.

प्रथमतः मा. अध्यक्षांनी विस्ताराने जनश्री विमा योजना तसेच या योजनेसह एलआयसी द्वारा माफक रक्कम दिल्यास अन्य लाभ सुध्दा उपलब्ध असल्याची माहिती दिली. जनश्री विमा योजनेंतर्गत खालील लाभ आहेत.

1. नैसर्गिक मृत्यू ओढवल्यास वारसास रू 30000
2. अपघाती मृत्यू ओढवल्यास वारसास रू 75000
3. अपघातामुळे कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास रू 75000
4. अपघातामुळे कायमस्वरूपी अंशतः अपंगत्व आल्यास रू 37500
5. शिक्षण सहाय्य दोन मुलांकरीता रू 100 दरमहा.

   या लाभासोबत मापक रक्कम भरल्यास एलआयसी द्वारा खालील लाभ उपलब्ध आहेत.

   1. **उपदान योजना**– वार्षिक दराने रक्कम देय. तसेच मृत्यू ओढवल्यास वारसास पूर्ण रक्कम.
   2. **पेन्शन योजना**– निश्चित दराने पेन्शन देय असणे तसेच मृत्यू ओढवल्यास पती/पत्नीस पेन्शन मिळणे.
   3. **गटविमा योजना**– अपघाती मृत्यू तसेच नैसर्गिक मृत्यू दोन्हीसाठी लागू.
   4. **बालिका योजना**– रू 10 हजार भरल्यास बालिकेस वयाच्या 18 व्या वर्षी रू 1 लाख व विमा सवलत.

एलआयसीच्या योजना घेण्यात विशेष लाभ म्हणजे कार्यालयाचे नोंदणी इत्यादीचे अभिलेख एलआयसी यास पूर्णपणे स्वीकारार्ह आहेत. त्यामुळे कागदपत्र व माहिती अभावी कामगार लाभापासून वंचित राहणार नाहीत. योजनेचे लाभ तर मिळताच शिवाय जीवन विम्याचे संरक्षण मिळते. जनश्री व राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना लागू करण्याबाबतचे शासनाचे पत्रही दाखविण्यात आले. अधिक माहिती हवी असल्यास एलआयसी चे अधिकारी बोलाविले आहेत. तेही शंका निरसण करू शकतील.

यावर श्री. फुले यांनी त्यांचा नोडल एजन्सी म्हणून जनश्री विमा योजनेबाबतचा अनुभव चांगला नसल्याचे तसेच श्री डोंगरे यांनी एलआयसीच्या

योजनेत वैद्यकीय सवलती नाहीत. दवाखान्यात भरती होण्यासाठीची सवलत नाही, ही बाब स्पष्ट केली. कामगार प्रतिनिधींनी एकमताने एलआयसीच्या योजना राबविण्यास नकार दिला व स्पष्ट केले की, यापूर्वीच्या बैठकीत सुध्दा जनश्री विमा योजनेस विरोध केलेला होता व आताही यास विरोध आहे. जनश्री विमा योजना बांधकाम कामगारास हितावह नाही. यात प्रसूती लाभ, दवाखान्यात भरती होणे इत्यादी सुविधा अंतर्भुत नाही. म्हणून स्पर्धेद्वारे कंपनीची निवड व्हावी. त्यावर मा.अध्यक्षांनी अन्य विमा कंपन्यांकडील पॉलिसीसाठी रिसतर जाहिरात देवून प्रस्ताव मागवावे लागतील. तसेच यात मध्यस्थ ठेवता येणार नाही, हे स्पष्ट केले. यावर चर्चा होवून विहीत पध्दतीने या विमा कंपनीची योजना राबविण्याचे ठरले.

**<u>विषय कमांक 3</u>– नोंदीत कामगारांच्या पाल्यांना शैक्षणिक सुविधा देणेबाबत.**

मागील बैठकीत मंडळाने नोंदीत कामगारांच्या पाल्यांसाठी मंजूर केलेल्या शैक्षणिक योजना रद्द केलेल्या होत्या. याबाब पुन्हा सविस्तर चर्चा झाली व चर्चेअंती कामगार प्रतिनिधींनी या योजना चालू करण्याचा आग्रह धरला. अध्यक्षांनी स्पष्ट केले की, अन्य शासकीय योजनेचा सारखाच लाभ एकाच वेळी घेता येणार नाही. यावर सदस्यांनी तसे अर्जदाराकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे, असे सुचविले. व सर्वानुमते या शैक्षणिक योजना चालू करण्याचे ठरले.

**<u>विषय कमांक 4</u>– अन्य विषयाबाबतची चर्चा.**

श्री फुले यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात मंडळाचे बाबतीत दाखल केले गेलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत उपलब्ध करून देण्याची विनंती केली. अध्यक्षांनी ही प्रत शासनाकडून मिळवून देण्यात येईल, असे सांगितले. यापूर्वी मंजूर झालेले ठरावांची अंमलबजावणी शिघ्र व्हावी, असा आग्रह श्री फुले यांनी धरला. जे की मान्य करण्यात आले. तसेच देण्यात आलेल्या नोंदणीची माहिती अचुक असावी, असे स्पष्ट केले. श्री देवतळे यांनी नागपूर विभागात विशेषतः चंद्रपूर येथील कामाची पध्दत चुकत असून, नोंदणी व उपकराची वसूली इत्यादी व्यवस्थीत व शिघ्र होत नसल्याची बाब नजरेस आणून दिली. तसेच उपकर ही जमा होत नाही. यापूर्वी पत्राद्वारे कळविल्याची वस्तुस्थिती विशद केली. बैठकीचे इविवृत्त व सुचना ई–मेलवर दयावी. तर श्री. फुले यांनी ते लवकर दयावे, असे सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी याबाबत संबंधीतांना कळवून माहिती घेणे व सुचना देणे इत्यादी केले जाईल, असे सांगितले. श्री डोंगरे यांनी योजनांची माहिती

इत्यादीसाठी जाहिरात देण्याची आवश्यकता व्यक्त केली. मा. अध्यक्षांनी यास मान्यता दिली. श्री डोंगरे यांनी निरीक्षकांच्या पाठविलेले प्रस्तावात 30 निरीक्षकांऐवजी 35 निरीक्षकांची पदे नमूद असणे आवश्यक असल्याचे सांगितले. जे की मान्य करण्यात आले. तसेच पदे भरण्याबाबत श्री डोंगरे यांनी आग्रह धरला. तसेच मंडळ निर्णय घेण्यास व राबविण्यास सक्षम असल्याने मंडळाच्या ठरावाबाबत शासनास विचारण्याची आवश्यकता नाही यावर जोर दिला.तसेच विहीत नमुन्यापेक्षा कामगारांची अधिक माहिती घ्यावी, असे सुचविले. नियमावली बनवावी, मंडळाची पदे भरावी व मंडळीची वेतनश्रेणी करावी, नोंदणी वाढविली जावी, असे सुचविले. त्याचप्रमाणे मागिल बैठकीच्या इतिवृत्तांतातील मंडळासाठीच्या इमारतीसाठीच्या बाबीच्या नोंदीच्या शब्द रचनेबाबत स्पष्ट केले की, मंडळाची स्वतंत्र यंत्रणा उभी करण्याच्या दृष्टीकोनातून मुख्य कार्यालय जाणीव जागृती केंद्र, विश्रांतीगृह इत्यादींसाठी शासन मंजूरी घेवून ही बाब राबविली जावी. मंडळाने प्रसिध्दी कार्यक्रम घ्यावा. ज्याने मंडळाच्या योजनांची सर्वांना माहिती होईल.

मा. अध्यक्षांनी कामगारांच्या कौशल्य वृध्दीबाबत शासनाच्या व्यवसाय शिक्षण विभागाचे अधिकारी व अन्य मान्यता प्राप्त संस्था यांचे समवेत झालेल्या बैठकीची माहिती दिली. कामगारांना प्रशिक्षण, साईटवर किंवा संस्थेत देणे. प्रशिक्षण कालावधी 15 दिवस ते 03 महिने असणे तसेच. अर्ध्या किमान वेतन इतके प्रशिक्षण कालावधीत विद्यावेतन देण्याऐवजी ते पूर्ण किमान वेतन दरानुसार देणे योग्य आहे. यावर सर्व सदस्यांनी पूर्ण किमान वेतन दराप्रमाणे विद्यावेतन दयावे यास मान्यता दिली.

सन्माननीय सदस्यांनी नोंदणी संख्या वाढविणे तसेच योजनेस आवश्यक असलेली कामगारांबाबतची माहितीही व्यवस्थीत घेणे. व्यापक पसिध्दी देणे, आवश्यक अवजारे, सायकल, छत्री, मच्छरदानी याबाबत चर्चा केली. मंडळाने मोठा कार्यक्रम घेतल्यास व्यापक प्रसिध्दी होईल. याबाबत प्रयत्न करण्याचे ठरले.

कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई